NAAC Accredited - 2023
'B' Grade (CGPA 2.42)

# -: परिपत्रक :-

विषय:- विविध विद्याशाखा / विभागांतर्गत विविध विषयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत...
संदर्भ:- या कार्यालयाचे पत्र क्र.३८१५, दि.२२/०७/२०१५.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलातील विभाग प्रमुखांना या परिपत्रक कळविण्यात येते की, शैक्षणिक विभागामध्ये वेगवेगळ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेश देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने आपणाला यापूर्वीच संदर्भिय पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी आपणास पुनःश्च कळविण्यात येते की,

शासनाने दिलेल्या आदेशानुसार व आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पुढीलप्रमाणे विद्यार्थी प्रवेशासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | | आरक्षणानुसार टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | S.C | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | S.T | ७% |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३% |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २% |
| ७. | इतर मागास वर्ग | OBC | १९% |
| ८. | सर्वसाधारण (खुला) | OPEN | ५०% |

शासन निर्णयानुसार विविध विषयाच्या अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ५०% व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५०% जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.बीईसी १०००/(१२३/२०००) तांशि - १ दि.१७/०४/२००० नुसार पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता महिलांसाठी ३०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात. तसेच अपंगासाठी ३% टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

प्रवेशासाठी आवश्यक पध्दत पढीलप्रमाणे-

१. विशेष मागास प्रवर्ग व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम १३९७/१२९२६/(१०८६)/तांशि-१ दि.११ जुलै ,१९९७ नुसार दिलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती. त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

Co-ordinator,
I.Q.A.C.
Arts & Commerce College,
Madha. Dist. Solapur.

Arts & Commerce College Madha

Principal,
Arts & Commerce College
Madha.Dist.Solapur

३. शासनाने दिलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार एकूण ५० टक्के जागा आरक्षित [illegible] प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील.

४. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

५. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २% जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सर्वसाधारण करून भरण्यात याव्यात.

६. ज्या विषयात सर्व प्रवर्गासाठी जागा उपलब्ध होत नसतील तेथे आरक्षणामध्ये वर उल्लेख केलेल्या आरक्षण क्रमानुसार प्रथम अ.जाती, अ.जमाती, विजा (अ) ,भज (ब),भज (क), भज(ड), व इमाव या क्रमाने आरक्षण टक्केवारी विचारात घेऊन जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

७. शैक्षणिक विभागामार्फत येणाऱ्या बिगर राखीव जागा या प्रथमत: भरण्यात याव्यात यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश असेल या विद्यार्थ्यांच्या समावेश आरक्षणामध्ये करण्यात येवू नये. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात. शैक्षणिक विभागात प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांच्या इतर गटातील अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यामधून शासन निर्णयानुसार अंतर्गत बदलाने उमेदवारांना प्रवेश देऊन आरक्षण पूर्ण करण्यात यावे.

८. महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती वगळता इतर सर्व प्रवर्गांना लागू राहील.

९. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांना आरक्षणाच्या कोणत्याही सवलती /फायदे प्राप्त होणार नाहीत.

१०. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५०% टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी संलग्न महाविद्यालये व संकुलातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी उक्तप्रमाणे शासनाने दिलेल्या आदेशानुसार व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीइएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१ दि.११ जुलै. १९९७ नुसार प्रवेशाबाबतची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

जावक क्र.सोविसो/म.वि.वि.मं./विशेष कक्ष/२०१६-१७/ 9195
दिनांक :- -7 OCT 2016

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सोबत- वरीलप्रमाणे

प्रत:-
१) मा.प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.
२) मा.संचालक, सर्व संलग्नित संकुले, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.
३) प्रवेश विभाग ,सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.

Co-ordinator,
I.Q.A.C.
Arts & Commerce College
Madha. Dist. Solapur.

Arts & Commerce College Madha

Principal,
Arts & Commerce College
Madha,Dist.Solapur